**सुभाषित :**

कान्तं वक्ति कपोति काकुलतया नाथान्तकालोऽधुना
व्याधोऽधो धृतचापसज्जितशरः श्येनः परिभ्रामति |
इत्थं सत्यहिना स दष्ट इषुणा श्येनोऽपि तेनाहतस्तूर्णं
तौ तु यमालयं प्रति गतौ दैवी विचित्रा गतिः ||

**अर्थ :**

रडवेली होउन कबुतरीण कबुतराला म्हणते, "नाथ, आता शेवट आलाय. (झाडा)खाली पारधी धनुष्याला बाण लावून (आपल्याला मारायला) सज्ज झालाय (आणि वरती) ससाणा घिरट्या घालतोय." असं असताना त्या (पारध्याला) साप चावला (आणि त्याचा नेम चुकल्याने) त्या बाणाने ससाणा पण जखमी होऊन ते दोघे लगेचच यमाच्या दरबारी गेले. नशिबाची चाल वेगळीच होती. (अगदी मृत्युच्या दाढेतून ते कबुतर-कबुतरीण सुटले.)